# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## Savitribai Phule Pune University

(formerly University of Pune)

### अधिसभा निवडणूकीसाठी नोंदणीकृत पदवीधर मतदारसंघाची दुरुस्त मतदार यादी प्रसिध्द करणेबाबत

### जाहीर प्रकटन

**संदर्भ क्र. १ : साफुपुविनि/१२, दिनांक १३ जून, २०२२**
**संदर्भ क्र. २ : महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरुप परिनियम क्र. १(८)**
**संदर्भ क्र. ३ : साफुपुविनि/८३, दिनांक ०७ सप्टेंबर, २०२२**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(न)[(28(2)(t)] व कलम १३१ मधील तरतुदीनुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे दहा (१०) नोंदणीकृत पदवीधर (**Registered Graduates**) अधिसभेवर (**Senate**) निवडून द्यावयाचे आहेत. याकरिता मतदार नोंदणी करण्यासाठी संदर्भ क्र. १ अन्वये ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते. संदर्भ क्र. २ अनुसार तयार करण्यात आलेल्या नोंदणीकृत पदवीधर मतदारसंघाची तात्पुरती मतदार यादी तसेच अपात्र ठरलेल्या अर्जांची यादी (कारणासहित) विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर संदर्भ क्र. ३ अन्वये प्रसिध्द केली होती. संदर्भ क्र. २ अनुसार तयार करण्यात आलेली नोंदणीकृत पदवीधर मतदारसंघाची दुरुस्त मतदार यादी विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर दुरुस्त मतदार यादीमध्ये मा. कुलसचिव यांच्या निदर्शनास आणून दिलेल्या वगळलेल्या किंवा चुकीच्या नोंदीबाबतच्या हरकती विचारात घेण्यात आल्या आहेत. या हरकतींवरील निर्णयाच्या अनुषंगाने संदर्भ क्र. २ अनुसार प्रसिध्द करण्यात येत असलेल्या दुरुस्त मतदार यादीबाबत काही अपील करावयाचे असल्यास सदर अपील दुरुस्त मतदार यादी प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून पाच दिवसांच्या आत म्हणजेच **शनिवार, दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२२ ते गुरुवार, दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२२ रोजी संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत** मा. कुलगुरु यांचे कार्यालयाकडे आवश्यक कागदपत्रांसह समक्ष अथवा **puvc@unipune.ac.in** या ईमेल वर दाखल करण्यात यावे. तसेच त्याची प्रत विद्यापीठाच्या निवडणूक विभागास समक्ष सादर करण्यात यावी किंवा **election@unipune.ac.in** या ईमेल वर पाठविण्यात यावी. विहीत मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा / ई-मेलचा अथवा नव्याने करण्यात येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/९९
दिनांक : २०/०९/२०२२

(डॉ.प्रफुल्ल पवार)
कुलसचिव